# आंबेडकर आणि गांधी

**इनामदार ऋषिकेश किरण** सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग श्रीमती. मीनलबेन महेता महाविद्यालय, पाचगणी

मोबाईल नं : ७०५८९३०२०१ Email. id : rushiinamdar10@gmail.com

---

**गोषवारा:** मोहनदास करमचंद गांधी यांना 'राष्ट्रपिता' म्हणूनही ओळखले जाते, ते भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे मुख्य शिल्पकार होते आणि बीआर आंबेडकर हे स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार होते.भारताच्या निर्मितीमध्ये दोन्ही नेत्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. अनेक क्षेत्रांत वेगवेगळी समजूत असूनही दोघांच्याही अनेक संकल्पना समान होत्या. ब्राह्मणवादास विरोध, उदारमतवादाच्या मर्यादा उल्लंघून जाण्याचा प्रयत्न आणि स्वातंत्र्य-समता-बंधुता या मूलमंत्रांच्याही पुढे जाऊन प्रज्ञा-मैत्री-करुणा व शील यावर आधारित भ्रातृभावात्मक समाजाची निर्मिती ही आंबेडकर यांच्या विचारांची ठळक वैशिष्ट्ये ठरतात .तर साम्राज्यवादास विरोध, आधुनिक युरोपियन संस्कृतीस विरोध, अस्पृश्यतेस विरोध, उदारमतवादी लोकशाही, संसदीय लोकशाहीवर टीका, शोषण व अन्यायाविरुद्ध सत्याग्रह, संघर्ष करणे, अहिंसात्मक समाजाची निर्मिती, राज्यसंस्थेच्या हिंसक स्वरूपाची समीक्षा, राज्य व नागरी समाजाच्याही पलीकडे जाऊन आत्मनिर्भर, भ्रातृभावावर आधारित शोषणरहित समाजाची निर्मिती ही गांधी यांच्या विचारांची ठळक वैशिष्ट्ये ठरतात. गांधी-आंबेडकरांमधील बौद्धिक वादविवाद हा प्राय: दोन नेत्यांच्या अस्पृश्यता जातीव्यवस्थेचे दुर्गुण यांना कसे भिडायचे यावरून जडलेला दिसतो. गांधीजी आणि बाबासाहेब दोघेही कर्तृत्ववान नेते होते. त्यांची एकमेकांशी स्पर्धाही होती. गांधीजी आधी अतिशय सनातनी होते. ते चातुर्वर्ण्य मानत असत. ते गिताभक्त होते. त्यांचा रामराज्यावर विश्वास होता. खेड्यांकडे चला हा त्यांचा नारा होता. बाबासाहेबांना हे विचार मान्य नव्हते. शहरांकडे चला असे बाबासाहेब सांगत होते. सामाजिकदृष्ट्या संकुचित असलेले गांधीजी बाबासाहेबांमुळे विस्तारत गेले. त्यांचा वैचारिक विकास होत गेला. बाबासाहेबसुद्धा फक्त दलितांचे नेते न राहता शेतकरी, महिला, बलुतेदार-अलुतेदार, कामगार यांचे नेते बनत गेले. गांधीजींशी त्यांनी केलेल्या संघर्षातून ते राष्ट्रीय नेते बनले. ते दोघेही बॅरिस्टर होते. प्रचंड लोकप्रियता हे दोघांचेही समान वैशिष्ट्य होते. गरिबांविषयी कळवळा हे दोघांचेही मुख्य गुणसुत्र होते.

**Key words :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, सामाजिक सुधारणा, राजकीय हक्क, अस्पृश्यता निवारण, जातिव्यवस्था , हिंदू धर्म

**प्रस्तावना:** एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकातील राजकीय आणि तंत्रज्ञानिक आव्हाने विसाव्या शतकाच्या मध्यातील दशकांहून खूपच वेगळी आहेत. तरीही नैतिक व सामाजिक आव्हाने स्थूल मानाने सारखीच राहिलेली आहेत. जात आणि लिंग यातील समानतेसाठीचा लढा संपलेला नाही. आंतरधर्मीय सरावासाठीची लढाई अत्यंत महत्त्वाची आणि निकडीची झाली आहे. त्यामुळे व्देषाने पछाडलेल्या हिंदुत्ववादी झुंडींना हरवायचे असेल, तर आवश्यकता आहे गांधी आणि आंबेडकर हे दोघेही एकाच बाजूला असण्याची! 'गांधी आणि आंबेडकर हे एकमेकांना पूरक आहेत', अशा पध्दतीने त्यांच्याकडे पाहिले जावे असे 'द फ्लेमिंग फिट' या पुस्तकात दिवंगत लेखक डी.आर.नागराज यांनी आग्रहाने प्रतिपादन केले.

गांधीजींचा जन्म १८६९ चा तर बाबासाहेबांचा जन्म १८९१ चा. या दोघांच्या वयात सुमारे २२ वर्षांचे अंतर होते. हे एका पिढीचे अंतर आहे. ही "जनरेशन गॅप" त्या दोघांमध्ये असल्याने प्राधान्यक्रम वेगवेगळा होता. बाबासाहेबांचे रक्त तरूण असल्याने ते आक्रमक होते तर गांधीजी शांत, सहनशील आणि संवादी. दाखवायला संत आतून मात्र पक्के राजकारणी. बनियाच. त्या दोघांची सामाजिक पार्श्वभुमी, त्यांचे कौटुंबिक संस्कार आणि एकमेकांचे समकालिन असूनही वेगवेगळा असलेला काळ यांचाही त्यांच्या जडणघडणीवर परिणाम झालेला आहे. दोघांमध्ये अनेक मुद्यांवर मतभेद होते. सायमन कमिशनवर काँग्रेसने बहिष्कार घातला होता. बाबासाहेब सायमनला भेटले. पहिल्या गोलमेज परिषदेवरही काँग्रेसने बहिष्कार घातला होता. बाबासाहेब परिषदेला उपस्थित होते. १९४२ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब्रिटीश मंत्रीमंडळात सहभागी झाले होते. त्याकाळात काँग्रेसने " चले जाव चा" नारा दिलेला होता. आंबेडकर व गांधी यांच्यातील वैचारिक साम्यता व फरक यातूनच भारतीय समाज जडणघडणीची प्रक्रिया झालेली दिसून येते.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

1. या शोधनिबंधातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या विचारांचा आढावा घेणे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या विचारातील साम्य स्थळे व वादाचे मुद्दे जाणून घेणे.

**संशोधन पद्धत आणि तथ्य संकलन :** प्रस्तुत शोधनिबंध तयार करताना गुणात्मक पद्धतीचा व दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने संदर्भग्रंथ, लेख, मासिके, अहवाल, इंटरनेट इ. वापर करण्यात आलेला आहे.

**गांधी-आंबेडकरांच्या भेटी** : गांधी-आंबेडकरांच्या तिन्ही भेटी गाजल्या. पहिल्या भेटीच्या वेळी गांधीजींनी मी तुम्हाला भेटायला येतो असं कळवलं. बाबासाहेब शिष्टाचार पाळणारे होते. ते स्वत: गांधीजींना भेटायला गेले. गांधीजी मात्र तेव्हा आढ्यतेनं वागले. त्यांनी मुद्दामच बाबासाहेबांचा पाणउतारा केला. हा अपमान बाबासाहेबांच्या जिव्हारी लागला. गांधीजी असं

का वागले? महादेवभाई आपल्या डायरीत लिहितात, "बापू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ब्राह्मण समजत होते. अस्पृश्यांबद्दलचा दिखाऊ कळवळा असलेले समजत होते. दक्षिण आफ्रिकेहून भारतात परतल्यावर गांधीजी नामदार गो. कृ. गोखल्यांना भेटले. गोखल्यांनी त्यांना भारतभ्रमण करण्याचा व महत्वाच्या राजकीय नेत्यांना भेटण्याचा सल्ला दिला. त्याकाळात गांधीजी अनेकांना भेटले. त्यात केतकर, दांडेकर, जावडेकर, बावडेकर, गोळवलकर यांचा समावेश होता. तसेच आंबेडकरही ब्राह्मण असावेत त्यांचा समज झाला. पहिल्या भेटीत जेव्हा बाबासाहेब म्हणाले, " गांधीजी, मला मातृभूमी नाही" तेव्हा गांधीजी चरकले. आपली चूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. दुसरी भेट लंडनला झाली. तेव्हा गांधीजींनी आपला विश्वासघात केला असा बाबासाहेबांचा समज झाला. तेव्हा गांधीजी दुटप्पीपणानं वागले होते. मुस्लीमांना गांधीजी म्हणाले, "मी तुमच्या सगळ्या मागण्या मान्य करतो, मात्र तुम्ही अस्पृश्यांच्या मागणीला विरोध करा." ही मुत्सद्देगिरी गांधीजींना फार महाग पडली. बाबासाहेब त्यांच्यापासून आणखी दुरावले. गांधीजींवरचा बाबासाहेबांचा विश्वासच उडाला. गांधीजी हे विश्वासघातकी आहेत, त्यांच्या वागण्याने आपल्या काळजावर डागण्या दिल्या गेलेल्या होत्या असे बाबासाहेब म्हणत असत. [पाहा- डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड, १८, भाग २, पृ. २२० ] डॉ. आंबेडकरांचे पंख छाटण्याचा प्रयत्न गांधीजींनी केला. शेरास सव्वाशेर म्हणून काँग्रेसमध्ये फूट पाडायचा प्रयत्न बाबासाहेबांनी केला. [पाहा - डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड, १८, भाग २, पृ.२२६ ] पुणे कराराच्या वेळी या दोघांमध्ये न भुतो न भविष्यती अशी कटुता निर्माण झाली. "ॲनिहीलेशन ऑफ कास्ट" मधल्या पत्रव्यवहारात या दोघांमधल्या कटुतेचे पडसाद उमटलेले आहेत. घटना परिषदेतल्या बाबासाहेबांच्या पहिल्या भाषणाने गांधीजी आणि काँग्रेस नेतृत्व चकीत झाले. बाबासाहेबांची राष्ट्रहिताची व्यापक भुमिका बघून त्यांनी बाबासाहेबांशी असलेले सगळे मतभेद विसरून सहकार्याचा हात पुढे केला. काँग्रेस व बाबासाहेब या दोघांनी घटना परिषदेत एकत्र मिळूनमिसळून काम केले. बाबासाहेब आणि गांधीजी एकत्र आले नसते तर असे द्रष्टे, पोलादी आणि सम्यक, सेक्युलर संविधान भारताला मिळालेच नसते. घटना परिषदेवर १९४६ मध्ये बाबासाहेब पहिल्यांदा बंगालच्या ज्या मतदार संघातून निवडून आले होते तो खुलना मतदार संघ भारताच्या फाळणीमुळे पाकीस्तानात गेल्याने जुलै १९४७ ला बाबासाहेबांचे घटना परिषदेवरील सदस्यत्व रद्द झाले होते. दरम्यान काँग्रेसचे सदस्य बॅ. एम.आर. जयकर यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या काँग्रेसच्या जागेवर काँग्रेसने बाबासाहेबांना घटना परिषदेवर स्वत:च्या कोट्यातून पुन्हा बिनविरोध निवडून दिले. ही वस्तुस्थितीनिदर्शक बाब काही हितसंबंधियांकडून मुद्दामहून दडवली गेलेली आहे. बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या रिक्त झालेल्या जागेवर बॅ. बाबासाहेब आंबेडकरांना जुलै १९४७ मध्ये मुंबईतून घटना सभेवर बिनविरोध निवडून आणले. त्यांना ऑगष्ट १९४७ मध्ये स्वतंत्र भारताचे कायदे मंत्रीपद दिले गेले. म्हणून बाबासाहेब संविधान लिहू शकले. भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार बनू शकले. एकेकाळी चातुर्वर्ण्य आणि जातीपाती मानणारे गांधीजी शेवटी मी फक्त आंतरजातीय विवाहांनाच उपस्थित राहीन अशी अट घालण्याइतपत पुढे गेलेले होते. काळानुरूप गांधीजी खूप बदलले. प्रतिसादात बाबासाहेबही बदलले. घटना सभेत काँग्रेसचे ८२% पेक्षा ज्यादा बहुमत असतानाही घटनेत अस्पृश्यता निर्मुलन, आरक्षण, राष्ट्रध्वजावर धम्मचक्र यासारख्या अनेक गोष्टी बाबासाहेब आणू शकले. काँग्रेसचे सहकार्य नसते तर ह्या गोष्टी मंजूर झाल्याच नसत्या. हे दोघेही एकमेकांमुळे आणखी मोठे झाले. राष्ट्रव्यापीच नाही तर विश्वभर विस्तारले.

**अस्पृश्यतेचा प्रश्न:** भारतीय समाजातील समग्र परिवर्तनाची पूर्वअट म्हणून आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारण हा कळीचा प्रश्न मानला. हा प्रश्न वर्ण- जातिव्यवस्थात्मक समाजरचनेमुळे निर्माण झाल्यामुळे अस्पृश्यतेचे निर्मूलन म्हणजे वर्ण-जातिपृथक समाजव्यवस्थेचे निर्मूलन या निष्कर्षाप्रत आंबेडकर येतात. या वर्ण-जातिपृथक समाजव्यवस्थेला ज्या ब्राह्मणी धर्माने पावित्र्य बहाल केले व नैतिक अधिष्ठान दिले त्या विषमतामूलक ब्राह्मणी धर्माला व त्या पायावर उभ्या असलेल्या हिंदू धर्माला संपूर्ण नकार दिल्याशिवाय सामाजिक समता प्रस्थापित होणे अशक्यच व अशा समतेशिवाय नवा भारत घडणेही अशक्य आहे. म्हणून जातिनिर्मूलनाबरोबरच ब्राह्मण्य व ब्राह्मणी धर्माचा सर्वंकष धिक्कार आंबेडकरांनी सांगितला.

गांधींनीही अस्पृश्यतेचा प्रश्न कळीचा प्रश्न मानला. अर्थात त्या संदर्भातील त्यांची भूमिका व त्या मागील प्रेरणा हळूहळू बदलत गेल्या, पण अधिकाधिक प्रगल्भ होत गेल्या. दक्षिण आफ्रिकेत वंशवादाविरुद्ध लढा देताना व सर्वांना वंशनिरपेक्ष समान वागणूक मिळावी असा आग्रह धरताना 'ज्या हिंदू समाजात जातिभेद व अस्पृश्यतेच्या आधारे समता नाकारली जाते, त्या हिंदू समाजातील व्यक्तींना वंशनिरपेक्ष समता मागण्याचा नैतिक अधिकार कसा काय पोचतो', असा प्रश्न गांधींना विचारला गेला होता. या घरच्या आहेरातून त्यांना अस्पृश्यतेच्या प्रश्नावर अंतर्मुख बनवले होते. म्हणूनच त्यांनी अस्पृश्यतेचा पहिला जाहीर धिक्कार दक्षिण आफ्रिकेतच केला. त्या प्रश्नावर त्यांनी आपल्या देशबांधवांचे प्रबोधन सुरू केले. 'तुम्ही जोवर अस्पृश्यता पाळता तोवर कॅनेडीयन, दक्षिण आफ्रिकी, व तत्सम अन्य परकीय राजवटी तुम्हाला असमान वागणूक देतात, याबद्दल त्यांना दोष देता येणार नाही', असे गांधी आपल्या देशबांधवांना सांगत.स्वातंत्र्यचळवळीची सूत्रे हाती घेतल्यावर आणि पहिल्या महायुद्धानंतर ब्रिटिश राजवटीबाबत पुरता भ्रमनिरास झाल्यानंतर गांधींना अस्पृश्यतेच्या प्रश्नाचे वास्तविक संदर्भ अधिकाधिक स्पष्ट झाले. त्याबरोबर अस्पृश्यतेच्या प्रश्नाचे राजकीय परिमाण अधिक ठळकपणे त्यांच्या नजरेत भरले. साहजिकच भारतीय स्वातंत्र्य

आंदोलनाची पूर्वअट म्हणून हिंदु-मुस्लिम ऐक्याबरोबरच हिंदू आणि पंचमवर्णाच्या (अस्पृश्य) ऐक्याचाही त्यांनी उच्चार केला. असहकार आंदोलन हे पंचमवर्णाच्या सहकार्याशिवाय यशस्वी होणार नाही. त्यासाठी सवर्ण हिंदूंना मुसलमानांबरोबर पंचमवर्णाशीही ऐक्य साधावे लागेल व त्यांच्या प्रश्नांना भिडावे लागेल असा इशारा गांधी 1920 पासून देऊ लागले. ‘परकी सरकाराशी असहकार’ म्हणजे प्रजेतील विविध समाजघटकांमधील सहकार. हिंदू जोवर अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढणार नाहीत, तोवर स्वराज्य येणार नाही’ असाही इशारा गांधींनी दिला.

ब्रिटिश साम्राज्यवाद्यांची दुहेरी नीती हा इतर राष्ट्रीय नेत्यांप्रमाणेच गांधींचाही चिंतेचा विषय होता. हिंदू-शिख, हिंदू-मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर याबरोबरच सवर्ण- अवर्ण असा आणखी एक भेद गांधींना नको होता. अस्पृश्यतेचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर घेण्यामागे गांधींची प्रारंभाची प्रेरणा ही प्राय: राजकीय होती. याचे कारण, त्या प्रश्नांची दाहकतादेखील गांधींना मुख्यत्वे वास्तविक राजकारणाच्या संदर्भातून प्रथम उमगली होती. अर्थात, गांधींचे अस्पृश्यतेच्या प्रश्नासंबंधीचे आकलन जसजसे प्रगल्भ होत गेले तसतसे राजकीय परिमाणाबरोबरच या प्रश्नाला एक खोल नैतिक व सामाजिक न्यायाचेही परिमाण आहे, या भूमिकेपर्यंत गांधी आले. गांधींची अस्पृश्यतेच्या प्रश्नाबाबतची जाण प्रगल्भ होण्यामध्ये ‘आंबेडकरांनी गांधी व काँग्रेस यांच्यावर अस्पृश्यांच्या प्रश्नाबाबत केलेली घणाघाती टीका’, हा एक फार मोठा निर्णायक घटक होता हे विसरून चालणार नाही. त्यावेळी ‘गांधींनी व काँग्रेसने अस्पृश्यांसाठी काय केले?’ असा प्रश्न आंबेडकरांनी उपस्थित केला नसता तर गांधींची या प्रश्नाची जाण कितपत तीव्रतर झाली असती, याबाबत साशंक होण्याइतपत परिस्थिती होती.

"If the Hindu mass-mind is not yet prepared to banish untouchability root and branch, it must sacrifice me without the slightest hesitation" असेही गांधींनी (16 सप्टेंबर 1932 च्या ‘स्टेटमेंट टू द प्रेस’ मध्ये) बजावले होते. गांधी आपल्या मृत्यूचा धाक हा प्राय: सवर्ण हिंदूंना घालत होते हे स्पष्ट आहे. प्रथम अस्पृश्यतेच्या व अस्पृश्यवर्गाच्या प्रश्नासंबंधी वसाहतवादी सरकारला चार हात दूर ठेवणे, ह्या प्रश्नांची नैतिक जबाबदारी प्राय: हिंदुसमाजाची आहे असे मानून स्पृश्य हिंदूंना अस्पृश्यतेच्या प्रथेविरुद्ध जागृत करणे व अंतिमत: अस्पृश्यांच्या कल्याणार्थ व्रतस्थ होणे, ही गांधींची अस्पृश्यता निवारणाची रणनीती होती. वर म्हटल्याप्रमाणे अस्पृश्यतेच्या प्रश्नासंबंधी आंबेडकरांचे आकलन मूलत:च वेगळे होते. अस्पृश्यता हे जातिव्यवस्थेचे फलित आहे ही त्यांची धारणा होती. जातिनिर्मूलनाशिवाय अस्पृश्यता जाणार नाही. पण जातिनिर्मूलनात सवर्णांना रस नसल्याने अस्पृश्यांच्या उपलब्ध राजकीय ताकदीच्या बळावर परकी सत्तेच्या उपस्थितीमुळे लाभलेल्या अनुकूलतेचा फायदा घेऊन अस्पृश्यवर्गाचे हितसंबंध वसाहतवादी राजकारणाच्या चौकटीत जितके जपता येतील तितके जपणे, ही आंबेडकरांची रणनीती होती.

अस्पृश्यवर्गाच्या हातात राजकीय सत्ता आल्याशिवाय, त्यांना सत्तेत वाटा मिळाल्याशिवाय त्यांची ताकद वाढू शकणार नाही, हे आंबेडकरांना माहीत होते. अशी ताकद आल्याशिवाय ब्राह्मणवादाच्या विरोधात अस्पृश्यवर्ग समर्थपणे उभा राहणार नाही हेही ते जाणून होते. म्हणूनच अस्पृश्यतानिवारणातील लढ्याचा एक भाग म्हणून अस्पृश्य वर्गांच्या राजकीय जमातीकरणाची रणनीती आंबेडकरांनी स्वीकारली होती. ज्या राजकीय जमातीकरणाच्या तत्त्वावर मुसलमानांना विभक्त मतदार संघ देण्यास राष्ट्रीय नेते तयार होते, तोच न्याय अस्पृश्यांनाही का लागू करू नये, असा खडा सवाल आंबेडकर काँग्रेसला करतात.

आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यांत गांधींनी सवर्ण/ दलित अशा आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला. गांधींच्या विचारांमध्ये सातत्य (कन्सिस्टन्सी) नव्हते, अशी टीका केली जाते. ‘कन्सिस्टन्सी इज द व्हर्च्यू ऑफ द फूल’ (मूर्ख माणसाचा गुण) असे बर्नार्ड शॉ म्हणत असे. हर्बर्ट फिशर या जर्मन अभ्यासकाने गांधींविषयी म्हटले आहे कीत् यांच्या सातत्य नसण्यातही एक प्रकारचे सातत्य होते, हेच खरे आहे. वर्णाश्रम धर्माबाबत त्यांची भूमिका बदलण्यात आणि ती प्रगतिशील बनण्यात डॉ.आंबेडकरांचा निग्रही लढा कारणीभूत होता, असे गुहा म्हणतात आणि हेच निदान समाजवादी नेते मधू लिमये यांनी आपल्या ‘डॉ.आंबेडकर : एक चिंतन ’ या पुस्तकात केले आहे.

**सामाजिक की आधी राजकीय ?** ‘आधी सामाजिक की आधी राजकीय?’ या जुन्या वादासारखे त्यांच्यातील विचारभेदाचे स्वरूप तीव्र नसले, तरी त्यातील अग्रक्रमाबाबत त्यांच्या भूमिका भिन्न होत्या. स्वातंत्र्य ही गांधींची, तर समता ही आंबेडकरांची पहिली मागणी होती. गांधी समतेच्या बाजूने होते; मात्र त्यांच्या मते, तो देशातील समाजाने स्वतः सोडवायचा प्रश्न होता. त्याआधी ब्रिटिशांची सत्ता इथून घालविणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. तर आंबेडकरांचे म्हणणे- त्यांची सत्ता गेली तरी येथे सवर्णांची व उच्च जातीच्या लोकांची सत्ता राहील आणि दलितांच्या वाट्याला असलेले नष्टचर्य त्याही स्थितीत कायम राहील, असे होते. ‘राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक समतेच्या लढ्याला प्राधान्य द्या’ ही त्यांची गांधी व काँग्रेससह साऱ्या देशाकडे मागणी होती... अधिक काळजीपूर्वक पाहिले, तर या दोन्ही भूमिका परस्परपूरक होत्या. स्वातंत्र्य व समता दोन्ही मूल्ये लोकशाहीत बसणारी असली, तरी त्याविषयीचे टोकाचे आग्रह त्या मूल्यांनाच पराभूत करणारे ठरतात. स्वातंत्र्याची परिणती विकसितांच्या जास्तीच्या विकासात आणि त्यांच्याकडून इतरांच्या होणाऱ्या जास्तीच्या शोषणात होऊ शकते, तर समतेचा

टोकाचा आग्रह व्यक्तींच्या अभिक्रमावर बंधने आणणारा व ती नाहीशी करणारा ठरतो. या दोन्ही मूल्यांच्या समन्वयाचा आग्रह आदर्श समाजजीवन धरते आणि तीच त्या मूल्यांची महती व मर्यादाही आहे.

दोघांच्या पहिल्या भेटीत गांधीजींनी वयाचा, आपल्या सिनियारिटीचा मुद्दा उपस्थितही केला होता. गांधीजी म्हणाले, "आंबेडकर, तुमचा जन्मही झाला नव्हता तेव्हापासून मी हरिजनांसाठी काम करतोय. "बाबासाहेबांनी त्यावर हजरजबाबीपणे अतिशय कठोर उत्तर दिले होते. " गांधीजी, आधी जन्मलेले सगळेच लोक असा दावा करू शकतात. प्रश्न असाय की, महात्मे येतात नी जातात, त्यांच्यामुळे सामान्य माणसांचा जीवनस्तर उंचावतो की फक्त धूळ तेव्हढी ऊडते? हेही तपासले जायला हवे."आज हे दोघे असते तर देशाची लोकशाही, संविधान, बहुसांस्कृतिकता, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, न्याय, समता आणि बंधुतेसाठी दोघांनी आपापले मतभेद बाजूला ठेऊन हातात हात घालून एकत्र काम केले असते.

**संदर्भ ग्रंथ :**

१. डॉ. नागराज, द फ्लेमिंग फीट एंड अदर एसेज द दलित मूवमेंट इन इंडिया,Seagull Books London Ltd. २०११
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड, १८,
३. मधू लिमये, 'डॉ.आंबेडकर : एक चिंतन' , आत्माराम ,१९९१
४. कसबे रावसाहेब , गांधी , लोक्वन्मय , २०२०
५. नामदेव कांबळे, महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर : संघर्ष आणि समन्वय, राजहंस , २००९